# महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना, पुणे

(सहा. निबंधक, पुणे नोंदणी क्र.११५१ दि. ३१/५/१४ व धर्मदाय आयुक्त, पुणे नों. क्र. फ - ४८३०० दि. २३/३/२०१७)
संस्थापक पदाधिकारी : अध्यक्ष - मा. अरूण बोंगिरवार. विशेष अध्यक्ष - मा. अरविंद इनामदार, कार्याध्यक्ष - मा. र. ग. कर्णिक

| ❖ अध्यक्ष ❖ | ❖ विशेष अध्यक्ष ❖ | ❖ कार्याध्यक्ष ❖ |
| --- | --- | --- |
| श्री. चंद्रकांत दळवी (भाप्रसे) | इंजि. व्यंकटराव गायकवाड | इंजि. मनोहर पोकळे |
| विभागीय आयुक्त (से.वि.) महसूल | सचिव (से.वि.), जलसंपदा | मुख्य अभियंता व सहसचिव (से.वि.) जलसंपदा |


## परिपत्रक क्र.३०

दि. १३/०३/२०२५

**विषय : जिल्हा कार्यकारीणीतील पदाधिकारी यांचे कामाचा सातत्याने आढावा घेऊन प्रतिवर्षी फेररचना करणेबाबत**

संदर्भ : या संघटनेचे परिपत्रक क्र.१३ दि.१०/०५/२०२३ व परिपत्रक क्र.२० दि.०८/१०/२०२४

उपरोक्त परिपत्रक क्र. १३ नुसार जिल्हा, विभागीय व राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांनी नेमकी कोणती कामे करावीत याबाबत **सर्व स्तरावर सुसूत्रता येण्याच्या दृष्टीकोनातून जॉब चार्ट निर्गमित करण्यात आला आहे. तदनंतर परिपत्रक २० नुसार जिल्हा कार्यकारी मंडळाचे निवडणूक नियम, कार्यकाळ, पदाधिकारी यांची संरचना, व कार्यकारीणीच्या बैठका याबाबत मार्गदर्शक सूचनादेखील निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.**

जिल्हा शाखेमध्ये नवनवीन सदस्य समाविष्ट होतात. तसेच **सामाजिक उपक्रम राबविण्याची कार्यवाही करणे व जिल्हा कार्यकारीणीची कार्यक्षमता वाढविणे ही संस्थेच्या विकासातील काळाची गरज आहे.** यासाठी जिल्हास्तरावर कार्यकारी मंडळात सातत्याने सभासद नोंदणीचा आढावा, पदाधिकाऱ्यांची बैठकीतील उपस्थिती व त्यांचे कामकाजातील योगदान, आर्थिक, बौद्धिक व कामकाजास वेळ देणे इ. बाबींचा आढावा घेऊन नवीन सभासदांना त्यांच्या कलागुणांना वाव देण्याचे दृष्टीने पुनर्रचना करणे आवश्यक असल्याचे मध्यवर्ती कार्यकारी मंडळात ठरले. **वर्षभरातील कामाचा आढावा घेऊन प्रत्येक वर्षी जिल्हा शाखांची कार्यक्षमता वाढविणेसाठी वर्षाचे शेवटी पुनर्रचना करण्यात यावी.**

उपरोक्त विषय हा मध्यवर्ती कार्यकारी मंडळाच्या १५ व्या सभेतील दि.२०/२/२०२५ ठराव क्र. १७/४ अन्वये मंजूर करण्यात आला आहे.

उक्त सूचनांचे काटेकोरपणे अनुपालन करणेची दक्षता जिल्हा / मध्यवर्ती कार्यकारी मंडळानी घ्यावी.

जा.क्र.कृनिअकसं/पुणे/ ४० सन २०२५
दिनांक : १३/०३/२०२५

मनोहर पोकळे
इंजि. म. कि. पोकळे
कार्याध्यक्ष

प्रत, माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
मा.अध्यक्ष, विशेष अध्यक्ष, विभागीय अध्यक्ष व सर्व उपाध्यक्ष
मा. पालक अधिकारी सर्व जिल्हे/ सर्व जिल्हा अध्यक्ष/ सचिव / प्रवर्तक,
म.रा.कृनिअकसं. मध्यवर्ती पदाधिकारी /मास्टर फाईल, परिपत्रक धारीका

## परिपत्रक क्र.२९

दि. १२/०३/२०२५

**विषय :** **कृतिशील मध्यवर्ती संघटनेस प्राप्त जिल्हा निधीच्या २०% निधी वर्ग करणेबाबत मार्गदर्शक सूचनांचे पुनर्विलोकन करणे**

संदर्भ : या संघटनेचे परिपत्रक क्र. १८ दि.०७/०३/२०२४

कृपया उपरोक्त संदर्भीय परिपत्रकाचे अवलोकन करण्यात यावे. त्याअनुषंगाने जिल्हास्तरावरुन २०% निधी कृतिशील मध्यवर्ती संस्थेस देण्याबाबतचे विवरण पत्र व मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. आजअखेर राज्यात **अहिल्यानगर, सातारा, सोलापूर, अमरावती व मालेगाव या जिल्ह्यांनी त्यांची विवरणपत्रे सादर केली आहेत.** तर बाकीच्या जिल्ह्यांनी याबाबत उदासिनता दाखविली आहे.

एप्रिल २०२३ पासून आश्रयदाता व आजीवन सभासदांची वर्गणीची रक्कम ही मध्यवर्ती व जिल्हा शाखांमध्ये त्या त्या स्तरावर मुदत ठेव स्वरुपात कायम स्वरुपी गुंतवावी असे ठरले आहे. विवरण पत्र सादर करणाऱ्या आघाडीच्या काही जिल्ह्यांनी सभासदांची वर्गणीची रक्कम वगळून राहिलेल्या उत्पनाचा २०% हिश्याची रक्कम खूपच जास्त होत असल्याचे मध्यवर्तीचे निदर्शनास आणले आहे. यास्तव मध्यवर्ती कार्यकारी मंडळाच्या १५ व्या सभेत दि.२०/०२/२०२५ विषय क्र.११ अन्वये विषयसूचीमध्ये चर्चेसाठी समाविष्ट करण्यात आला होता. त्यावर सर्व सदस्यांनी चर्चेत भाग घेऊन जिल्ह्यांनी **मध्यवर्तीला द्यावयाचा २०% हिस्सा हा इतर उत्पन्नाच्या बाबीबरोबर प्रत्येक उपक्रमाचा झालेला योग्य तो वाजवी खर्च वजा जाऊन राहिलेल्या उत्पन्नाच्या २०% हिस्सा असेल अशी दुरुस्ती परिपत्रक क्र. १८मध्ये करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. परिपत्रक क्र.१८ मधील इतर उर्वरीत बाबी योग्य असल्याचे दृढीकरण करण्यात आले.**

कृपया वरील दुरुस्तीची नोंद घेऊन मध्यवर्ती संघटनेस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

जा.क्र.कृनिअकसं/पुणे/२९ सन २०२५
दिनांक : १२/०३/२०२५

मनोहर पोकळे
इंजि. म. कि. पोकळे
कार्याध्यक्ष

प्रत, माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
मा. अध्यक्ष, विशेष अध्यक्ष, विभागीय अध्यक्ष, व सर्व उपाध्यक्ष
मा. पालक अधिकारी, सर्व जिल्हे, सर्व जिल्हा अध्यक्ष/ सचिव / प्रवर्तक,
म.रा.कृनिअकसं. मध्यवर्ती पदाधिकारी
मास्टर फाईल, परिपत्रक धारीका

महाराष्ट्र शासनाच्या निवृत्तीवेतनधारकांची
महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना, पुणे
(सहा. निबंधक, पुणे नोंदणी क्र.११५१ दि. ३१/५/१४ व धर्मदाय आयुक्त, पुणे नों. क्र. फ - ४८३०० दि. २३/३/२०१७)
संस्थापक पदाधिकारी : अध्यक्ष - मा. अरूण बोंगिरवार. विशेष अध्यक्ष - मा. अरविंद इनामदार, कार्याध्यक्ष - मा. र. ग. कर्णिक

❖ अध्यक्ष ❖
श्री. चंदकांत दळवी (भाप्रसे)
विभागीय आयुक्त (से.वि.) महसूल

❖ विशेष अध्यक्ष ❖
इंजि. व्यंकटराव गायकवाड
सचिव (से.वि.), जलसंपदा

❖ कार्याध्यक्ष ❖
इंजि. मनोहर पोकळे
मुख्य अभियंता व सहसचिव (से.वि.) जलसंपदा

# परिपत्रक क्र.२८

दि. १२/०३/२०२५

**विषय :** **सभासद नोंदणीची कार्यपद्धती विकसीत करणे**

संदर्भ : कृतिशील मध्यवर्ती कार्यकारी मंडळाची १५ वी सभा इतिवृत्त ठराव क्र. ९ दि.२०/०२/२०२५

कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेचे राज्यस्तरीय मुख्यालय पुणे येथे आहे. व त्याचे अधिनस्त राज्यभर जिल्हानिहाय कृतिशील शाखा कार्यरत आहेत. **सद्यस्थितीमध्ये मध्यवर्ती व प्रत्येक जिल्हा स्तरावर सभासदांची नाव नोंदणी करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.** व त्यास त्यांच्या स्तरावर सभासद क्र. हे सभासद नोंदवहीतील अनुक्रमांकानुसार दिले जातात. राज्यस्तरीय संकलन करीत असतांना संबंधीत सभासद कोणत्या जिल्ह्याचा आहे हे समजू शकत नाही. यास्तव राज्यातील काही जिल्ह्यांनी मध्यवर्ती स्तरावर एकत्रिक सभासद नोंदणी क्र.असावा अशी मागणी करण्यात आली होती.

त्या अनुषंगाने सभासद नोंदणी कार्यपद्धती विकसीत करण्यासाठी दि.२०/०२/२०२५ कृतिशील कार्यकारी मंडळाच्या बैठकीत विषय क्र.९ चर्चेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर राज्याची इतर खाते व संघटना यांच्या स्तरावर करीत असलेली नोंदणी कार्यपद्धती याचा अभ्यास करुन खालीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबण्याविषयी ठराव क्र.९ दि.२०/०२/२०२५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

१. राज्यातील सर्व सभासदांची एकत्रित मध्यवर्ती नोंदणी क्र. ठेवणे, आपलेकडील सभासद संख्या व मनुष्यबळ पाहता उचित ठरत नाही.
२. यासाठी प्रत्येक जिल्ह्याने / मध्यवर्ती पुणे स्तरावर सचिवांनी / सरचिटणीसांनी सभासद नोंदवही स्वतंत्र ठेवावी. त्यासाठी संबंधित जिल्ह्याची संक्षिप्त अद्याक्षरे ठेवून अनुक्रमांक वितरीत करावे. उदा. अहिल्यानगर साठी अहि-१, अहि-२, अहि-३ इ.इ, नांदेड जिल्ह्यासाठी नांदे-१, नांदे-२ इ.इ. तर मध्यवर्ती पुणे साठ मपु-१, मपु-२ याप्रमाणे सभासद नोंदणी क्रमांक देण्यात यावेत.
३. आर्थिक वर्षभरात नोंदविलेल्या सभासदांची विहित नमुन्यात (निर्देश सुचना क्र.५५ दि.२०/०१/२०२४) एकत्रित (Updated) यादी सॉफ्टकॉपी मध्ये संघटनेचा ईमेल आयडी asgrf2014@gmail.com वर न चुकता पाठविण्यात यावी. हार्डकॉपी पाठविण्यात येऊ नये.
४. राज्यातील सर्व जिल्ह्यांचे नोंदणी कार्यपद्धती सोबत जोडलेल्या सहपत्रानुसार असावी, याची कृपया सर्व संबंधितांना दक्षता घ्यावी.

जा.क्र.कृनिअकसं/पुणे/ ३८ सन २०२५
दिनांक : १२/०३/२०२५

मनोहर पोकळे
इंजि. म. कि. पोकळे
कार्याध्यक्ष

प्रत, माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
मा. अध्यक्ष, विशेष अध्यक्ष, विभागीय अध्यक्ष, व सर्व उपाध्यक्ष
मा. पालक अधिकारी, सर्व जिल्हे, सर्व जिल्हा अध्यक्ष/ सचिव / प्रवर्तक, म.रा.कृनिअकसं. मध्यवर्ती पदाधिकारी
मास्टर फाईल, परिपत्रक धारीका

## कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना, पुणे

## आपल्या राज्यस्तरीय संघटना व जिल्हास्तरीय सभासद नोंदणी कार्यपद्धती परिपत्रक क्र.२८ चे सहपत्र

| अ.क्र. | जिल्हा | सभासद नोंदणी क्रमांक | अ.क्र. | जिल्हा | सभासद नोंदणी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | अहिल्यानगर | अहि-१, अहि-२ ---- | २० | ठाणे | ठा-१, ठा-२ ---- |
| २ | नाशिक | ना-१, ना-२ ---- | २१ | पालघर | पा-१, पा-२ ---- |
| ३ | पुणे | पु-१, पु-२ ---- | २२ | धुळे | धु-१, धु-२ ---- |
| ४ | मध्यवर्ती पुणे | मपु-१, मपु-२ | २३ | नंदूरबार | नं-१, नं-२ ---- |
| ५ | सातारा | सा-१, सा-२ ---- | २४ | यवतमाळ | य-१, य-२ ---- |
| ६ | अमरावती | अम-१, अम-२ ---- | २५ | वाशिम | वा-१, वा-२ ---- |
| ७ | सोलापूर | सो-१, सो-२ ---- | २६ | बुलडाना | बु-१, बु-२ ---- |
| ८ | नांदेड | नांदे-१, नांदे-२ ---- | २७ | वर्धा | व-१, व-२ ---- |
| ९ | नागपूर | नाग-१, नाग-२ ---- | २८ | गोंदिया | गों-१, गों-२ ---- |
| १० | चंद्रपूर | चं-१, चं-२ ---- | २९ | गडचिरोली | गड-१, गड-२ ---- |
| ११ | जळगाव | जळ-१, जळ-२ ---- | ३० | छ.संभाजीनगर | छसं-१, छसं-२ ---- |
| १२ | जालना | जा-१, जा-२ ---- | ३१ | बीड | बी-१, बी-२ ---- |
| १३ | अकोला | अ-१, अ-२ ---- | ३२ | परभणी | पर-१, पर-२ ---- |
| १४ | कोल्हापूर | को-१, को-२ ---- | ३३ | हिंगोली | हि-१, हि-२ ---- |
| १५ | सांगली | सां-१, सां-२ ---- | ३४ | लातूर | ला-१, ला-२ ---- |
| १६ | भंडारा | भं-१, भं-२ ---- | ३५ | धाराशिव | धा-१, धा-२ ---- |
| १७ | रत्नागिरी | र-१, र-२ ---- | ३६ | मालेगाव | मा-१, मा-२ ---- |
| १८ | रायगड | रा-१, रा-२ ---- | ३७ | मुंबई जिल्हा व उपनगर जिल्हा | मु-१, मु-२ ---- |
| | | | ३८ | मालेगाव शहर | माश-१, माश-२ ---- |
| १९ | सिंधूदुर्ग | सिं-१, सिं-२ ---- | ३९ | नागपूर परिसर | नाप-१, नाप-२ ---- |

"ज्येष्ठ नागरिक ही राष्ट्राची मोल्यवान व परिपक्व संपत्ती आहे"

महाराष्ट्र शासनाच्या निवृत्तीवेतनधारकांची

# महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना, पुणे-९

(सहा.निबंधक, पुणे नोंदणी क्र. ११५१ दि.३१/५/२०१४ व धर्मदाय आयुक्त, पुणे नों.क्र.एफ-४८३०० दि.२३/०३/२०१७)

संस्थापक पदाधिकारी : मा.अरुण बोंगिरवार, अध्यक्ष. मा.अरविंद इनामदार, विशेष अध्यक्ष, व मा.र.ग.कर्णिक, कार्याध्यक्ष

Email : asgr२०१४@gmail.com
Web : www.krutishilnivrutta.org

श्री. टी. के. गुरव, सरचिटणीस मो.नं.९९७०५७४००४
ॲड. दशरथ बनसोडे, चिटणीस मो.नं.९८२२८८२२५८

## परिपत्रक क्र.२७

दि. २६/०२/२०२५

**विषय :** **सन २०२५-२६ मध्ये सेवानिवृत्त सन २०२५-२६ मध्ये व ज्येष्ठ नागरिकांसाठी वार्षिक कृति आराखड्यातील समाजोपयोगी कार्यक्रम राबविणे संबंधात अधिकच्या मार्गदर्शक सुचना व २०२४-२५ मधील माहे मार्च महिन्यात तातडीने समाजोपयोगी कार्यक्रम राबविणेबाबत**

संदर्भ : या संघटनेचे परिपत्रक क्र.१५ दि.२२/०७/२०२३

उपरोक्त परिपत्रकाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. सर्व जिल्हा शाखा व मध्यवर्ती संघटना, पुणे यांना दरवर्षी समाजोपयोगी कामाचा वार्षिक कृति आराखडा करणेविषयी सातत्याने सुचना देण्यात आलेल्या आहेत.

संघटना सभासदांच्या जीवनातील वैयक्तिक प्रश्नांसंबधात पेन्शन प्रकरणांसह काम करीत आहे. **त्याच बरोबर सेवा निवृत्त व ज्येष्ठ नागरिकांसाठी समाजोपयोगी कार्यक्रम राबविणे हे संघटनेच्या विधी नियमानुसार आवश्यक आहे.** कोणकोणते सामाजिक उपक्रम राबवावेत, याबाबत परिपत्रक क्र. १ व १० अन्वये सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. **त्यातील उपक्रम हे दिशादर्शक आहेत. त्याचबरोबर त्यात फेरफार करण्याचे अधिकार जिल्हाध्यक्षांना आहेत.** नियोजन आराखड्यामध्ये उपलब्ध साधनसामुग्री व संस्थेच्या सदस्यांची संख्या यांना विश्वासात घेऊन जास्तीत जास्त सामाजिक उपक्रमांचे नियोजन करणे अपेक्षित आहे.

परिपत्रक क्र.४ नुसार **काटकसरीचे धोरणांची अंमलबजावणी करण्याबाबत** सविस्तर मार्गदर्शन देखील करण्यात आलेले आहे. तर परिपत्रक क्र.७ जा.क्र.१५१ दि.२/११/२०२२ नुसार **संघटनेसाठी उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध करणेबाबत** सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. त्यास दि.**२६/०३/२०२३ चे सर्वसाधारण सभेने विषय क्र. ९ चे ठरावानुसार मान्यता दिली आहे.**

**परिपत्रक क्र.७ अन्वये कोणत्याही परिस्थितीत सभासद वर्गणी संघटनेच्या दैनंदिन खर्चासाठी वापरण्यात येणार नाही. मात्र ही रक्कम बँकेत मुदतठेव म्हणून ठेवून त्यावरील व्याज संघटनेच्या दैनंदिन खर्चासाठी वापरता येईल.**

सामाजिक उपक्रम राबविताना नियोजनाचे बाबतीत मार्गदर्शक सुचना वेळोवेळी निर्गमित केल्या आहेत. त्यास अधिन राहून सर्व जिल्ह्यांनी समाजोपयोगी कार्यक्रमाचे नियोजन करावे. **हे कार्यकम सामाजिक संस्था/संघटना यांचे संयुक्त विद्यमाने राबवावेत. उदा. लियो क्लब, लायन्स क्लब व जिल्हास्तरीय सर्व सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या संस्था व संघटना तसेच आपल्या संघटनेतील काही निष्णात व संघटनप्रेमी सभासदांची आर्थिक किंवा पायाभूत सेवा उपलब्ध करुन या कार्यक्रमाचे खर्च कमी करणे गरजेचे आहे.**

**मा.सनदी लेखापाल यांनी सन २०२३-२४च्या वार्षिक लेखे तयार करतांना, काही जिल्ह्यांकडून त्यांच्या निव्वळ उत्पन्नाचे (आजिव व आश्रयदाता सभासद फी वगळून) अखर्चित रक्कम शिल्लक राहिलेली दिसते. त्यांचा खर्च काही प्रमाणात सन २०२४-२५ मध्ये (मार्च महिन्यात) करणे अपेक्षित आहे.** तरी माहे मार्च २५ मध्ये खालील जिल्ह्यांकडून सहजगत्या होणारे समाजिक उपक्रम राबविण्याची कार्यवाही पूर्ण

करावी, १)अ.नगर, २)नासिक, ३) नांदेड, ४)सातारा, ५) अमरावती, ६) पुणे, ७) संभाजीनगर, ८) ठाणे व ९)मध्यवर्ती, पुणे. याची सुयोग्य नोंद येत्या सर्वसाधारण सभेत घेण्यात येणार आहे. याची सर्व जिल्हा शाखांनी नोंद घ्यावी.

नुकतेच **कृतिशीलच्या अहिल्यानगर जिल्हा शाखा, शिरुर, मध्यवर्ती पुणे, छ.संभाजीनगर, सातारा, नाशिक व मालेगाव** येथे गेल्यावर्षापासून नागरिकांसाठी **"नाडीपरिक्षण शिबीर"** आयोजित केल्याने त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. याची सर्वांनी नोंद घेणे गरजेचे आहे. मध्यवतीचे परिपत्रक क्र.७ मधिल बाबींच काटेकोरपणे पालन करुन उत्पन्नचे स्त्रोत विकसित करणे आवश्यक आहे. याकडे अध्यक्ष व सचिवांनी काळजीपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे.

**राज्यातील सर्व जिल्हा शाखांना समान वार्षिक कृति आराखडा असण्याची गरज प्रतिपादन करण्यात आली.** त्यानुसार १) नाडी परिक्षण शिबीर २-३ महिन्यातून एकदा, २) पेन्शनर डे १७ डिसेंबर, ३)जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवस २१ ऑगस्ट, ४)आंतराष्ट्रीय अतिवृद्ध नागरिक दिवस १ ऑक्टोबर साजरा करणे. ५) आरोग्य शिबीरे, ६)सेवानिवृत्तांच्या अडीअडचणीसाठी मार्गदर्शन करणे, ७)ज्येष्ठांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन (निबंध, लेख, गाणी व लघूनाटीका इ.) ८)तज्ञांचे विविध जिव्हाळयाच्या विषयांवर व्याख्याने आयोजित करणे, ९)वृद्धाश्रमास भेट व त्यांचेशी सुसंवाद साधणे, १०)सांस्कृतिक कार्यक्रम, ११)सहल आयोजित करणे, १२)वृक्षारोपण इ.या बाबी प्रत्येक जिल्ह्याच्या वार्षिक कृति कार्यक्रमात समाविष्ट असणे गरजेचे आहेत. याव्यतिरिक्त जास्तीचे उपक्रम जिल्हा शाखा घेऊ शकतात.

संबंधित जिल्हा शाखांचे सचिवांनी त्यांचे कार्यकारी मंडळात आराखडा सादर करावा व तो मान्यतेसाठी विभागीय अध्यक्ष यांचेकडे पाठवावा, व विभागीय अध्यक्षांनी मंजूरीची प्रत अभिलेखासाठी मध्यवर्तीकडे व संबंधीत पालक अधिकारी यांचेकडे पाठवावी. ज्या जिल्ह्यासाठी विभागीय अध्यक्षांची नियुक्ती झाली नाही, त्यांनी थेट मध्यवर्ती संघटनेकडे मान्यतेसाठी सादर करावेत.

या परिपत्रकाचे अनुपालन व अंमलबजावणी करणाऱ्या जिल्ह्यांचा वार्षिक सर्वसाधारण सभेत विशेष नोंद घेऊन सत्कार करण्यात येणार आहे. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

जा.क्र.कृनिअकसं/पुणे/ ३४ सन २०२५
दिनांक : २६/०२/२०२५

इंजि. म. कि. पोकळे
कार्याध्यक्ष

प्रत, माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
मा.विभागीय अध्यक्ष, अध्यक्ष, विशेष अध्यक्ष, सर्व उपाध्यक्ष
मा. पालक अधिकारी, सर्व जिल्हे
सर्व जिल्हा अध्यक्ष/ सचिव / प्रवर्तक,
म.रा.कृनिअकसं. मध्यवर्ती पदाधिकारी
मास्टर फाईल, परिपत्रक धारीका

ज्येष्ठ नागरिक ही राष्ट्राची मौल्यवान व परिपक्व संपत्ती आहे

महाराष्ट्र शासनाच्या निवृत्तीवेतनधारकांची

# महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना

**(सहा. निबंधक, पुणे नोंदणी क्र. 1151 दि. 31/5/14 व धर्मदाय आयुक्त, पुणे नों.क्र. फ-48300 दि. 23/3/2017)**

संस्थापक पदाधिकारी : अध्यक्ष - मा. अरूण बोंगिरवार, विशेष अध्यक्ष - मा. अरविंद इनामदार, कार्याध्यक्ष - मा.र.ग. कर्णिक

* अध्यक्ष *
श्री. चंद्रकांत दळवी (भाप्रसे)
विभागीय आयुक्त (से.नि.) महसूल

* विशेष अध्यक्ष *
इंजि. व्यंकटराव गायकवाड
सचिव (से.नि.) जलसंपदा

* कार्याध्यक्ष *
इंजि. मनोहर पोकळे
मुख्य अभियंता व सहसचिव (से.नि.) जलसंपदा

## परिपत्रक क्र.२६

दि. २५/०२/२०२५

**विषय : २०२५-२०२६ चे आगाऊ अर्थसंकल्प जिल्हा / मध्यवर्ती संघटनेने सादर करणेबाबत मार्गदर्शक सूचना**

यासाठी नमुना अंदाजपत्रक आपल्या मार्गदर्शनासाठी सोबत जोडले आहे. कृपया त्यातील जमा व खर्चाच्या बाबींसंबंधात गृहितके खालीलप्रमाणे विचारात घेण्यात आली आहेत.

१. सोबतच्या नमुना अंदापत्रकातील तरतूदी या उदाहरणादाखल आहेत. प्रत्येक जिल्हा शाखानिहाय त्या वेगवेगळ्या असू शकतात.
२. १०० आजीवन सभासद तर१० वार्षिक सभासद होतील असे गृहित धरले आहे.
३. जिल्हा शाखेकडून २०% निधी, परिपत्रक क्र.१८ दि.७/०३/२०२४ नुसार असणार आहे.
४. या संघटनेचे परिपत्रक क्र. ४/२०२२ प्रमाणे खर्च करताना काटकसरीच्या धोरणांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
५. आपल्या कडील पेन्शन प्रकरणांचा आढावा घेऊन त्यातून प्राप्त होणारा निधी हा देणगी म्हणून विचारात घ्यावा.
६. सर्वसाधारण देणगी या रकान्यात जिल्हा शाखेला मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नाच्या बाबी विचारात घेऊन रक्कम निश्चित करावी.
७. लढानिधीसाठी प्रत्येक जिल्ह्याने त्यांच्या सभासद संख्येप्रमाणे ऐच्छिक स्वरुपात परंतु भरघोस निधी उपलब्ध करण्याचे जिल्हा शाखेने प्रयत्न करणे बंधनकारक आहे. कारण सर्वांच्या मागण्यांसाठी मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयात याचिकेसाठी निधीची आवश्यकता असणार आहे.
८. सामाजिक उपक्रमाचे नियोजन सन २०२५-२६ मध्ये वार्षिक कृती आराखडा तयार करुन विविध उपक्रम परिपत्रक क्र.१५ दि.२२/७/२०२३ मधील सूचना विचारात घेऊन जास्तीत जास्त उपक्रम राबविण्याचे प्रयत्न करावयाचे आहे. **हे उपक्रम सेवानिवृत्त व ज्येष्ठ नागरिकांसाठी राबविणेत यावेत.**
९. जिल्हा कार्यकारीणी त्यांच्या अनुभवानुसार वरील थोड्याफार प्रमाणात गरजेनुसार बदल करु शकतात.

वरील मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन सन २०२५-२६ चे आगाऊ अंदाजपत्रक प्रत्येक जिल्हा शाखेने तयार करुन मार्च २०२५ च्या कार्यकारीणीच्या तातडीच्या बैठकीत प्राधान्याने मंजूर करवून घ्यावे. आगाऊ अंदाजपत्रक मंजूर केल्या शिवाय पुढील आर्थिक वर्षात केलेला खर्च अवैध ठरु शकतो.

प्रत्येक जिल्हाशाखेने कार्यकारीणीत मंजूर केलेले आगाऊ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक दि.१५ मार्च २०२५ पूर्वी मध्यवर्ती शाखेकडे पदाधिकारी यांच्या स्वाक्षरीसह स्कॅन केलेली प्रत ईमेल वर asgrf2014@gmail.com वर न चुकता पाठविण्यात यावी.

मुंबई विश्वस्त अधिनियम १९५० मधील कलम ३१(अ) नुसार विश्वस्तांना धर्मादाय आयुक्तांकडे आगाऊ अर्थसंकल्प सादर करणे कायद्याने बंधनकारक आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

मनोहर पोकळे

जा.क्र.कनिअकसं/पुणे/ ३३ सन २०२५
दिनांक : २५/०२/२०२५

कार्याध्यक्ष

प्रत, अध्यक्ष / उपाध्यक्ष, विभागीय अध्यक्ष, कृतिशील यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
प्रत, सर्व जिल्हाध्यक्ष/ सचिव महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना, यांना अग्रेषित संबंधित जिल्हा शाखा यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
प्रत, सर्व पदाधिकारी, मध्यवर्ती संघटना पुणे यांना माहिती व कार्यवाहीस्तव
प्रत, संघटनेच्या सर्व व्हाटस् अॅप ग्रुपवर प्रसिध्दीसाठी
प्रत, प्रसिद्धीपुत्रक धारीका / मास्टर फाईल

# कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना, पुणे

## नमुना अंदाजपत्रक 2025-26 (परिपत्रक क्र.26 चे सहपत्र)

शाखा : ----------------- जिल्हा

| | जमा बाबी | | | खर्चाच्या बाबी | |
|---|---|---|---|---|---|
| १ | आरंभीच शिल्लक | 100000 | 1 | सभागृह भाडे | 2000 |
| २ | स्थायी निधी | | 2 | चहा पानी नाश्ता | 4000 |
| | (i) चालू वर्षी आजीवन सभासद फी (100 सभासद) | 100000 | 3 | स्टेशनरी पोस्टेज | 10000 |
| | (ii) फॉर्म फी (आजीवन) | 1000 | 4 | स्मरणिका देणगी मध्यवर्तीकडे | 5000 |
| 3 | (i) संस्थेची सभासद फी (वार्षिक) | 1000 | 5 | बँक चार्जेस | 1000 |
| | (ii) फॉर्म फी | 100 | 6 | प्रवास खर्च | 5000 |
| 4 | स्मरणिका देणगी | 5000 | 7 | ऑडिट फी | 1000 |
| 6 | सर्वसाधारण देणगी | 50000 | 8 | सामाजिक उपक्रम खर्च | 100000 |
| 7 | पेन्शन प्रकरणे | 20000 | 9 | सादिल खर्च (बुके,फोटों ग्राफी,व्हिडीयो शूटिंग बुकलेट छपाई इ.) | 18100 |
| 8 | आश्रय दाते देणगी | 20000 | 10 | लधानिधी मध्यर्तीस वर्ग | 200000 |
| 9 | लढा निधी | 200000 | 11 | स्थायी निधी एफ.डी. करीता | 121000 |
| 10 | बँकेत खात्यावरील चालू व्याज | 5000 | 12 | 20% निधी मध्यवर्तीस वर्ग | 10000 |
| | | | | **एकूण** | 477100 |
| | | | | पुढील वर्षासाठी शिल्लक | 25000 |
| | एकूण | 502100 | | एकूण | 502100 |

सचिव    कोषाध्यक्ष    अध्यक्ष

ज्येष्ठ नागरिक ही राष्ट्राची मौल्यवान व परिपक्व संपत्ती आहे

महाराष्ट्र शासनाच्या निवृत्तीवेतनधारकांची

# महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना

(सहा. निबंधक, पुणे नोंदणी क्र. 1151 दि. 31/5/14 व धर्मदाय आयुक्त, पुणे नों.क्र. फ-48300 दि. 23/3/2017)

संस्थापक पदाधिकारी : अध्यक्ष - मा. अरूण बोंगिरवार, विशेष अध्यक्ष - मा. अरविंद इनामदार, कार्याध्यक्ष - मा.र.ग. कर्णिक

* अध्यक्ष *
**श्री. चंद्रकांत दळवी** (भाप्रसे)
विभागीय आयुक्त (से.नि.) महसूल

* विशेष अध्यक्ष *
**इंजि. व्यंकटराव गायकवाड**
सचिव (से.नि.) जलसंपदा

* कार्याध्यक्ष *
**इंजि. मनोहर पोकळे**
मुख्य अभियंता व सहसचिव (से.नि.) जलसंपदा

## परिपत्रक क्र.25

दि. 07/02/2025

विषय : **1) इच्छापत्र तयार करणे व त्याची अंमलबजावणी**
**2) सार्वजनिक विश्वस्त निधीचे व्यवस्थापन**
**3) खाजगी/कौटुंबिक विश्वस्त निधीचे व्यवस्थापन**
**4) मुखत्यार म्हणूनस्थावर व जंगम मिळकतीचे व्यवस्थापन**
**5) पालक म्हणून मिळकतीचे व्यवस्थापन**

उपरोक्त सर्व विषयांबाबत कागदपत्रे तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे हे सर्वच सेवानिवृत्तांचे दृष्टीने महत्वाचे असणार आहे. सेवानिवृत्तांचा कालखंड साधारणत: सरासरी 20 वर्षे पुरुष व महिला) जीवन जगू शकतात. त्यांचे आयुष्याच्या उत्तरार्धातील टप्पयात उपरोक्त गोष्टी कुठंतरी मनात राहून जातात, व त्या करण्याकरीता विश्वासार्ह असा स्त्रोत सर्वांनाच उपलब्ध होईल, याची शक्यता नसते. व याविषयी आपणास फारशी माहितीही नसते. त्यामुळे आपल्या मनातील हेतू/ नियोजन याची अंमलबजावणी करण्यासाठी या विषयाचे ज्ञान असणे अगत्याचे आहे. या हेतूने

**दि महाराष्ट्र एक्झीक्युटर अँड ट्रस्टी कं.प्रा.लि.यांचेकडून प्राप्त / उपलब्ध झालेले माहितीपत्रक** यासोबत आपल्या माहितीसाठी पाठविण्यात येत आहे. तेव्हा सर्व संबंधीतांनी त्याचे अवलोकन करुन आवश्यकतेनुसार आपल्या मनातील कल्पना वास्तवात उतरण्यासाठी त्याचा उपयोग होईल, याबद्दल विश्वास वाटतो.

सोबत दिलेले माहितीपत्रक हे केवळ मार्गदर्शक आहे. याव्यतिरीक्त इतर कोणतीही कंपनी / सल्लामसलत करणारी संस्था/कायदेशीर सल्लागार यांना देखील संपर्क करण्यास हरकत नाही.

या परिपत्रकाचा उद्देश केवळ सेवानिवृत्तांचे उपरोक्त विषयांसंबंधात माहिती देऊन आपणा सर्वांचे ज्ञान अद्यावत करण्याचा हा प्रयत्न आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

मनोहर पोकळे

जा.क्र.कनिअकसं/पुणे/ २२ सन २०२५

दिनांक : ०७/०२/२०२५

कार्याध्यक्ष

प्रत, अध्यक्ष / उपाध्यक्ष, विभागीय अध्यक्ष, कृतिशील यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
प्रत, सर्व जिल्हाध्यक्ष/ सचिव महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना, यांना अग्रेषित संबंधित जिल्हा शाखा यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
प्रत, सर्व पदाधिकारी, मध्यवर्ती संघटना पुणे यांना माहिती व कार्यवाहीस्तव
प्रत, संघटनेच्या सर्व व्हाटस् अॅप ग्रुपवर प्रसिध्दीसाठी
प्रत, प्रसिद्धीपत्रक धारीका / मास्टर फाईल

# दि महाराष्ट्र एक्झिक्युटर अँड ट्रस्टी कंपनी प्रा. लिमिटेड
## (बँक ऑफ महाराष्ट्रची उपकंपनी)

दि महाराष्ट्र एक्झिक्युटर अँड ट्रस्टी कंपनी प्रा.लि. ही बँक ऑफ महाराष्ट्रची संपूर्ण मालकीची उपकंपनी आहे. १० एप्रिल, १९४६ रोजी स्थापन झालेली ही कंपनी गेली ७८ वर्षे पुढील सेवा देत आहे. ● इच्छापत्राची तयार करण्यासाठी संपूर्ण मार्गदर्शन, मसुदा लेखन, इच्छापत्राची अंमलबजावणी ● सार्वजनिक विश्वस्तनिधीचे व्यवस्थापन ● कौटुंबिक/खाजगी विश्वस्तनिधीचे व्यवस्थापन ● मुखत्यार म्हणून स्थावर व जंगम मिळकतीचे व्यवस्थापन ● पालक गार्डियन म्हणून अज्ञान मुलांच्या मिळकतीचे व्यवस्थापन

### ❖ इच्छापत्र तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे.

आजच्या धकाधकीच्या जीवनात आयुर्विम्याला जे स्थान आहे तितकेच किंबहुना अधिक आपल्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबियांची आपल्या पश्चात आपल्या मिळकतीतून योग्य तरतूद करण्याला महत्व आहे. अशा व्यक्तींमध्ये पत्नी किंवा अज्ञान मुले असल्यास त्यांच्यासाठी केलेली व्यवस्था त्यांना निश्चितपणे लाभदायक होईल, याची खातरजमा करून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्या हयातीत आपल्या मिळकतीबाबत इच्छापत्र लिहून ठेवणे, ते योग्य त्या रितीने तपासून घेणे, त्यासाठी विश्वसनीय एक्झिक्यूटर नेमणे हे महत्याचे आहे. एखाद्या व्यक्तीने आपल्या स्वकष्टार्जित मिळकतीचा आपल्या पश्चात विनियोग कसा व्हावा वा वाटप कसे करावे याविषयी आपल्या हयातीत कायद्यानुसार केलेला दस्त म्हणजे इच्छापत्र केलेले नसेल तर मृत व्यक्तीला त्याच्या धर्माप्रमाणे लागू असणाऱ्या वारसा कायद्यानुसार त्याच्या संपत्तीची वारसांत विभागणी होईल. त्यावेळी मुळ व्यक्तीची इच्छा काय होती हे बघितले जाणार नाही. म्हणूनच आपल्या इच्छेनुसार, आपल्या मिळकतीची विभागणी व विनियोग योग्यप्रकारे व्हावा यासाठी इच्छापत्र करणे आवश्यक आहे. अपुऱ्या माहितीच्या आधारे वा अज्ञानामुळे केलेले इच्छापत्र अनेक अडचणी निर्माण करते व त्यामुळे त्या मागचा मुळ हेतुच नष्ट होण्याची भीती असते. त्यामुळे इच्छापत्र, योग्य सल्ला व मार्गदर्शन घेऊनच करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे इच्छापत्रातील तरतुदींप्रमाणे मिळकतीच्या वाटपासाठी योग्य त्या व्यक्तीची / संस्थेची, इच्छापत्राचे व्यवस्थापक / एक्झिक्यूटर म्हणून नेमणूक करणे हितावह आहे. आमची कंपनी आपणास इच्छापत्र तयार करण्यास संपूर्ण कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन देते तसेच व्यवस्थापक म्हणुनही काम करते. बहुंताश कुटुंबात निकटवर्तीय नातलग मंडळी असुनही ती विखुरलेली असल्याने ते इच्छापत्रान्वये

व्यवस्थापक म्हणून येणारी जबाबदारी घ्यावयास नाखूष असतात. एकत्र कुटुंब पद्धतीही अलिकडे नष्ट होत चालली आहे. त्यात पुन्हा कायद्यामध्ये वेळोवेळी होणारे बदल, स्वतःच्या खिशातून होणारा खर्च, वेळेचा अभाव इत्यादी गोष्टींमुळे एक्झिक्युटर म्हणून अंमलबजावणीची जबाबदारी स्विकारण्यास सर्वसामान्य व्यक्ती नाखूष असतात. अशा परिस्थितीत या स्वरूपाची कामे करण्यासाठीच केवळ अस्तित्वात आलेल्या आमच्या संस्थेस एक्झिक्युटर नेमणे योग्य आहे. इच्छापत्र तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे संबंधी आम्ही पुढील कामे करतो. • आपल्या इच्छेप्रमाणे इच्छापत्राचा मसुदा तयार करणे, योग्य सल्ला व मार्गदर्शन करणे • स्थावर व जंगम मिळकतीचे वाटप व विनियोग इच्छापत्रातील तरतुदीनुसार करणे, जंगम मिळकतीचे वसुलीसाठी वेगवेगळ्या संस्थांशी पत्रव्यवहार करणे, स्थावर मिळकत विक्री करणे व आलेल्या रकमेचे वाटप करणे इ. • इच्छापत्रातील तरतुदींनुसार अज्ञान मुलांचे नावे असलेली मिळकत मुले सज्ञान होईपर्यंत वा व्यक्तीच्या हयातीपर्यंत ताब्यात ठेवणे व याबाबतचे हिशोब ठेवणे • इच्छापत्र केल्यानंतर अस्सल दस्ताऐवज कंपनीच्या ताब्यात ठेवता येतो त्याची रीतसर पावती दिली जाते. तसेच इच्छापत्राची अंमलबजावणी करण्याची वेळ येईपर्यंत त्याबाबत गुप्तता बाळगण्याची खबरदारी घेतली जाते. तसेच इच्छापत्रात काही बदल करावयाचे असल्यास त्यासाठी पुरवणी इच्छापत्र तयार करून दिले जाते.

### ❖ सार्वजनिक विश्वस्तनिधीचे व्यवस्थापन

आपण समाजात गरीब, अनाथ लोक पहातो. आपल्या मिळकतीमधील काही भाग सार्वजनिक कामाकरिता राखून ठेवावा व त्यासाठी कायम स्वरूपी योजना व व्यवस्था असावी अशी अनेकांची इच्छा असते. विश्वस्तनिधी स्थापन झाल्यावर आमची कंपनी व्यवस्थापकीय विश्वस्त म्हणून कामे करते. • विश्वस्तनिधी निर्माण करण्यासाठी लागणारे विश्वस्तपत्र तयार करणे व त्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करणे • व्यवस्थापक विश्वस्त म्हणून काम करणे • सदर विश्वस्तपत्र हे धर्मादाय आयुक्त यांचेकडे मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदवणे • आयकर कायद्यान्वये सार्वजनिक विवस्तनिधीची नोंदणी करणे. • जमा निधीची योग्य प्रकारे गुंतवणूक करणे, उद्दिष्ठानुसार उत्पन्नाचा विनियोग करणे, हिशोब ठेवणे. • ऑडिट करून घेणे, टॅक्स रिटर्न भरणे. • विश्वस्त मंडळाच्या सभा बोलावणे, सभेचा वृत्तांत लिहिणे, आवश्यक पत्रव्यवहार करणे, कार्यक्रमाचे आयोजन करणे, थोडक्यात म्हणजे सर्व आर्थिक व कायदेशीर बाबींची पूर्तता आमचेकडून योग्य रीतीने, सातत्याने व समर्थपणे केली जाते, जेणेकरून सल्लागार विश्वस्त ट्रस्टचे कार्य करण्यास मोकळे राहतात व तांत्रिक बाजूचा ताण त्यांचेवर राहत नाही.

## ❖ कौटुंबिक / खासगी विश्वस्तनिधीचे व्यवस्थापन

अनेक व्यक्तींना आपली पती/पत्नी, अल्पवयीन मुले, कुटुंबातील अपंग / मतीमंद व्यक्ती किंवा इतर जवळचे नातेवाईक यांच्यासाठी आर्थिक तरतूद करून ठेवावी असे वाटते. अशी तरतूद खासगी विश्वस्तनिधी निर्माण करून करता येते. यासाठी आम्ही पुढील कामे करतो. ● विश्वस्तनिधी निर्माण करण्यासाठी लागणारे खाजगी विश्वस्तनिधी तयार करणे व त्यासाठी आवश्यक मार्गदर्शन देणे ● व्यवस्थापक विश्वस्त म्हणून काम करणे ● निधीची गुंतवणूक करणे त्यावरील उत्पन्न जमा करणे. ● निधीच्या तरतूदीनुसार लाभाधिकाऱ्यांना चरितार्थासाठी तसेच अन्य गरजांसाठी रक्कम देणे. ● हिशेब ठेवणे व मुदत संपल्यावर निधीच्या व्यवस्थेप्रमाणे निधीचे वाटप करून निधीची समाप्ती करणे.

## ❖ मुखत्यार म्हणून स्थावर व जंगम मिळकतीचे व्यवस्थापन

हल्ली बऱ्याच पालकांची मुले परदेशी असतात व पालकही बऱ्याच वेळा परदेशी जातात, तसेच वृद्ध पती-पत्नी आपल्या मुलांपासून दूर राहात असतात. अशा वेळी आपल्या मिळकतीच्या व्यवस्थापनाचे काम तुम्ही आमचे कंपनीवर सोपवु शकता. मुखत्यार म्हणून आम्ही पुढील कामे करतो. ● आपल्या स्थावर व जंगम मिळकतीचे व्यवस्थापन ● बँका, कंपन्या, पोस्ट ऑफीस, युनिट ट्रस्ट इ. संस्थामधून आपल्या इच्छेनुसार गुंतवणूक, पुर्नगुंतवणूक करणे ● चेक, वॉरंट भरणे, व्याज जमा करून घेणे ● मुदत ठेव पावत्या, बाँडस्, युनीट सर्टिफिकेटस् शेअर्स इ. ताब्यात ठेवणे. ● लाईट बिल भरणे, प्रॉपर्टी टॅक्स, सोसायटी चार्जेस भरणे इ. ● घराची किरकोळ दुरूस्ती करून घेणे ● आपल्या गरजेनुसार व निर्देशानुसार जमा रक्कम चेकद्वारे / डिमांड ड्राफ्टने पाठविणे वा आपल्या घराजवळच्या बँकेतील आपल्या खात्यात जमा करणे. ● सर्व हिशेब ठेवणे. वरील सर्व सेवा गरजेनुसार घरपोच देण्याचीही व्यवस्था आहे.

## ❖ पालक (गार्डियन) म्हणून मिळकतीचे व्यवस्थापन

जर एखाद्या पाल्याचे आई वडील हयात नसतील तर गार्डीयन व वॉर्डस् अॅक्ट १८९० च्या तरतूदीनुसार अज्ञात व्यक्तींच्या मालमत्तेचे गार्डीयन म्हणून व्यवस्थापनाचे काम ही कंपनी स्वीकारते. यासाठी पुढील कामे करतो. ● कोर्टा मार्फत गार्डियन म्हणून नेमणूक करून घेणे. ● कोर्टाच्या मार्गदर्शनाखाली अज्ञान व्यक्तींच्या संपतीचा विनियोग करणे पालकांच्या जंगम मिळकती तसेच प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅज्युएटी, पेन्शन, एल. आय. सी., मोटार अॅक्सीडेंट क्लेम इ. मधील रकमा वसूल करणे व त्या योग्य प्रकारे गुंतवणे. ● हिशेब ठेवणे. सर्व संपत्ती कोर्टाच्या आदेशानुसार मुला-मुलीस सज्ञान झाल्यावर देणे.

❖ फायदे

सर्वात महत्वाचे म्हणजे वरील सर्व सेवा माफक शुल्क आकारून दिल्या जातात. जवळचे नातेवाईक, मित्र, हितचिंतक, व्यक्ती, सल्लागार इ. ची विश्वस्त या व्यवस्थापक म्हणून नेमणुक करण्यापेक्षा आमच्या सारख्या राष्ट्रीयकृत बँकेच्या कंपनीस काम देण्यात प्रामुख्याने पुढील फायदे आहे. ● कायमस्वरूपी कार्य ● व्यावसायिक ज्ञान व प्रदीर्घ अनुभव ● व्यवहारातील पारदर्शकता व उत्तरदायित्व अल्पखर्च ● नि:पक्षपाती काम ● संपर्काची साधने

**अधिक माहितीसाठी खालील पत्यावर संपर्क साधावा**

## दि महाराष्ट्र एक्झिक्युटर अँड ट्रस्टी कंपनी प्रा. लिमिटेड


* मुख्य पुणे कार्यालय *

५६८ केसरी वाडा, १ मजला, बँक ऑफ महाराष्ट्राच्या शेजारी, नारायण पेठ, पुणे ४११०३०. ✆: 9404051994,9404780787 (स.१० ते सायं ५)

✉ :punemetco@mahabank.co.in

* मुंबई कार्यालय *

द्वारा बँक ऑफ महाराष्ट्र, ६ मजला, जनमंगल ४५/४७ मुंबई समाचार मार्ग, कोर्ट मुंबई-४०००२३ ✆: 022 22625974/75, ✉ :metcomumbai@mahabank.co.in

* ठाणे कार्यालय *

द्वारा बँक ऑफ महाराष्ट्र बी३७, बागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) ४००६०४.

✆: 022 25826989, ✉ :metcothane@mahabank.co.in

* नागपूर कार्यालय *

द्वारा बँक ऑफ महाराष्ट्र, नागपूर विभागीय कार्यालय, डॉ. मुंजे चौक, सिताबर्डी नागपूर-४५००१२. ✆: 0712 2545035, ✉ :metco_nag@mahabank.co.in

"ज्येष्ठ नागरीक ही राष्ट्राची मोल्यवान व परिपक्व संपत्ता आहे"
महाराष्ट्र शासनाच्या निवृत्तीवेतनधारकांची
**महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना, पुणे-९**
(सहा.निबंधक, पुणे नोंदणी क्र. ११५१ दि.३१/५/२०१४ व धर्मदाय आयुक्त, पुणे नों.क्र.एफ-४८३०० दि.२३/०३/२०१७)
संस्थापक पदाधिकारी : मा.अरुण बोंगिरवार, अध्यक्ष. मा.अरविंद इनामदार, विशेष अध्यक्ष, व मा.र.ग.कर्णिक, कार्याध्यक्ष
Email : asgrf२०१४@gmail.com
Web : www.krutishilnivrutta.org
श्री. टी. के. गुरव, सरचिटणीस मो.नं.९९७०५७४००४
ॲड. दशरथ बनसोडे, चिटणीस मो.नं.९८२२८८२२५८

# परिपत्रक क्र.२७

दि. २६/०२/२०२५

**विषय :** **सन २०२५-२६ मध्ये सेवानिवृत्त सन २०२५-२६ मध्ये व ज्येष्ठ नागरिकांसाठी वार्षिक कृति आराखड्यातील समाजोपयोगी कार्यक्रम राबविणे संबंधात अधिकच्या मार्गदर्शक सुचना व २०२४-२५ मधील माहे मार्च महिन्यात तातडीने समाजोपयोगी कार्यक्रम राबविणेबाबत**

संदर्भ : या संघटनेचे परिपत्रक क्र.१५ दि.२२/०७/२०२३

उपरोक्त परिपत्रकाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. सर्व जिल्हा शाखा व मध्यवर्ती संघटना, पुणे यांना दरवर्षी समाजोपयोगी कामाचा वार्षिक कृति आराखडा करणेविषयी सातत्याने सुचना देण्यात आलेल्या आहेत.

संघटना सभासदांच्या जीवनातील वैयक्तिक प्रश्नांसंबधात पेन्शन प्रकरणांसह काम करीत आहे. **त्याच बरोबर सेवा निवृत्त व ज्येष्ठ नागरिकांसाठी समाजोपयोगी कार्यक्रम राबविणे हे संघटनेच्या विधी नियमानुसार आवश्यक आहे.** कोणकोणते सामाजिक उपक्रम राबवावेत, याबाबत परिपत्रक क्र. १ व १० अन्वये सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. **त्यातील उपक्रम हे दिशादर्शक आहेत. त्याचबरोबर त्यात फेरफार करण्याचे अधिकार जिल्हाध्यक्षांना आहेत.** नियोजन आराखड्यामध्ये उपलब्ध साधनसामुग्री व संस्थेच्या सदस्यांची संख्या यांना विश्वासात घेऊन जास्तीत जास्त सामाजिक उपक्रमांचे नियोजन करणे अपेक्षित आहे.

परिपत्रक क्र.४ नुसार **काटकसरीचे धोरणांची अंमलबजावणी करण्याबाबत** सविस्तर मार्गदर्शन देखील करण्यात आलेले आहे. तर परिपत्रक क्र.७ जा.क्र.१५१ दि.२/११/२०२२ नुसार **संघटनेसाठी उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध करणेबाबत** सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. त्यास दि.**२६/०३/२०२३ चे सर्वसाधारण सभेने विषय क्र. ९ चे ठरावानुसार मान्यता दिली आहे.**

**परिपत्रक क्र.७ अन्वये कोणत्याही परिस्थितीत सभासद वर्गणी संघटनेच्या दैनंदिन खर्चासाठी वापरण्यात येणार नाही. मात्र ही रक्कम बँकेत मुदतठेव म्हणून ठेवून त्यावरील व्याज संघटनेच्या दैनंदिन खर्चासाठी वापरता येईल.**

सामाजिक उपक्रम राबविताना नियोजनाचे बाबतीत मार्गदर्शक सुचना वेळोवेळी निर्गमित केल्या आहेत. त्यास अधिन राहून सर्व जिल्ह्यांनी समाजोपयोगी कार्यक्रमाचे नियोजन करावे. **हे कार्यकम सामाजिक संस्था/संघटना यांचे संयुक्त विद्यमाने राबवावेत. उदा. लियो क्लब, लायन्स क्लब व जिल्हास्तरीय सर्व सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या संस्था व संघटना तसेच आपल्या संघटनेतील काही निष्णात व संघटनप्रेमी सभासदांची आर्थिक किंवा पायाभूत सेवा उपलब्ध करुन या कार्यक्रमाचे खर्च कमी करणे गरजेचे आहे.**

**मा.सनदी लेखापाल यांनी सन २०२३-२४च्या वार्षिक लेखे तयार करतांना, काही जिल्ह्यांकडून त्यांच्या निव्वळ उत्पन्नाचे (आजिव व आश्रयदाता सभासद फी वगळून) अखर्चित रक्कम शिल्लक राहिलेली दिसते. त्यांचा खर्च काही प्रमाणात सन २०२४-२५ मध्ये (मार्च महिन्यात) करणे अपेक्षित आहे.** तरी माहे मार्च २५ मध्ये खालील जिल्ह्यांकडून सहजगत्या होणारे समाजिक उपक्रम राबविण्याची कार्यवाही पूर्ण

करावी, १)अ.नगर, २)नासिक, ३) नांदेड, ४)सातारा, ५) अमरावती, ६) पुणे, ७) संभाजीनगर, ८) ठाणे व ९)मध्यवर्ती, पुणे. याची सुयोग्य नोंद येत्या सर्वसाधारण सभेत घेण्यात येणार आहे. याची सर्व जिल्हा शाखांनी नोंद घ्यावी.

नुकतेच **कृतिशीलच्या अहिल्यानगर जिल्हा शाखा, शिरुर, मध्यवर्ती पुणे, छ.संभाजीनगर, सातारा, नाशिक व मालेगाव** येथे गेल्यावर्षापासून नागरिकांसाठी **"नाडीपरिक्षण शिबीर"** आयोजित केल्याने त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. याची सर्वांनी नोंद घेणे गरजेचे आहे. मध्यवतीचे परिपत्रक क्र.७ मधिल बाबींच काटेकोरपणे पालन करुन उत्पन्नचे स्त्रोत विकसित करणे आवश्यक आहे. याकडे अध्यक्ष व सचिवांनी काळजीपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे.

**राज्यातील सर्व जिल्हा शाखांना समान वार्षिक कृति आराखडा असण्याची गरज प्रतिपादन करण्यात आली.** त्यानुसार १) नाडी परिक्षण शिबीर २-३ महिन्यातून एकदा, २) पेन्शनर डे १७ डिसेंबर, ३)जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवस २१ ऑगस्ट, ४)आंतराष्ट्रीय अतिवृद्ध नागरिक दिवस १ ऑक्टोबर साजरा करणे. ५) आरोग्य शिबीरे, ६)सेवानिवृत्तांच्या अडीअडचणीसाठी मार्गदर्शन करणे, ७)ज्येष्ठांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन (निबंध, लेख, गाणी व लघूनाटीका इ.) ८)तज्ञांचे विविध जिव्हाळयाच्या विषयांवर व्याख्याने आयोजित करणे, ९)वृद्धाश्रमास भेट व त्यांचेशी सुसंवाद साधणे, १०)सांस्कृतिक कार्यक्रम, ११)सहल आयोजित करणे, १२)वृक्षारोपण इ.या बाबी प्रत्येक जिल्ह्याच्या वार्षिक कृति कार्यक्रमात समाविष्ट असणे गरजेचे आहेत. याव्यतिरिक्त जास्तीचे उपक्रम जिल्हा शाखा घेऊ शकतात.

संबंधित जिल्हा शाखांचे सचिवांनी त्यांचे कार्यकारी मंडळात आराखडा सादर करावा व तो मान्यतेसाठी विभागीय अध्यक्ष यांचेकडे पाठवावा, व विभागीय अध्यक्षांनी मंजूरीची प्रत अभिलेखासाठी मध्यवर्तीकडे व संबंधीत पालक अधिकारी यांचेकडे पाठवावी. ज्या जिल्ह्यासाठी विभागीय अध्यक्षांची नियुक्ती झाली नाही, त्यांनी थेट मध्यवर्ती संघटनेकडे मान्यतेसाठी सादर करावेत.

या परिपत्रकाचे अनुपालन व अंमलबजावणी करणाऱ्या जिल्ह्यांचा वार्षिक सर्वसाधारण सभेत विशेष नोंद घेऊन सत्कार करण्यात येणार आहे. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

जा.क्र.कृनिअकसं/पुणे/ ३४ सन २०२५
दिनांक : २६/०२/२०२५

इंजि. म. कि. पोकळे
कार्याध्यक्ष

प्रत, माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
मा.विभागीय अध्यक्ष, अध्यक्ष, विशेष अध्यक्ष, सर्व उपाध्यक्ष
मा. पालक अधिकारी, सर्व जिल्हे
सर्व जिल्हा अध्यक्ष/ सचिव / प्रवर्तक,
म.रा.कृनिअकसं. मध्यवर्ती पदाधिकारी
मास्टर फाईल, परिपत्रक धारीका

ज्येष्ठ नागरिक ही राष्ट्राची मौल्यवान व परिपक्व संपत्ती आहे

महाराष्ट्र शासनाच्या निवृत्तीवेतनधारकांची

# महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना

(सहा. निबंधक, पुणे नोंदणी क्र. 1151 दि. 31/5/14 व धर्मदाय आयुक्त, पुणे नों.क्र. फ-48300 दि. 23/3/2017)

संस्थापक पदाधिकारी : अध्यक्ष - मा. अरूण बोंगिरवार, विशेष अध्यक्ष - मा. अरविंद इनामदार, कार्याध्यक्ष - मा.र.ग. कर्णिक

* अध्यक्ष *
**श्री. चंद्रकांत दळवी** (भाप्रसे)
विभागीय आयुक्त (से.नि.) महसूल

* विशेष अध्यक्ष
**इंजि. व्यंकटराव गायकवाड**
सचिव (से.नि.) जलसंपदा

* कार्याध्यक्ष *
**इंजि. मनोहर पोकळे**
मुख्य अभियंता व सहसचिव (से.नि.) जलसंपदा

## परिपत्रक क्र.२६

दि. २५/०२/२०२५

**विषय : २०२५-२०२६ चे आगाऊ अर्थसंकल्प जिल्हा / मध्यवर्ती संघटनेने सादर करणेबाबत मार्गदर्शक सूचना**

यासाठी नमुना अंदाजपत्रक आपल्या मार्गदर्शनासाठी सोबत जोडले आहे. कृपया त्यातील जमा व खर्चाच्या बाबींसंबंधात गृहितके खालीलप्रमाणे विचारात घेण्यात आली आहेत.

१. सोबतच्या नमुना अंदापत्रकातील तरतूदी या उदाहरणादाखल आहेत. प्रत्येक जिल्हा शाखानिहाय त्या वेगवेगळ्या असू शकतात.

२. १०० आजीवन सभासद तर१० वार्षिक सभासद होतील असे गृहित धरले आहे.

३. जिल्हा शाखेकडून २०% निधी, परिपत्रक क्र.१८ दि.७/०३/२०२४ नुसार असणार आहे.

४. या संघटनेचे परिपत्रक क्र. ४/२०२२ प्रमाणे खर्च करताना काटकसरीच्या धोरणांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

५. आपल्या कडील पेन्शन प्रकरणांचा आढावा घेऊन त्यातून प्राप्त होणारा निधी हा देणगी म्हणून विचारात घ्यावा.

६. सर्वसाधारण देणगी या रकान्यात जिल्हा शाखेला मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नाच्या बाबी विचारात घेऊन रक्कम निश्चित करावी.

७. लढानिधीसाठी प्रत्येक जिल्ह्याने त्यांच्या सभासद संख्येप्रमाणे ऐच्छिक स्वरुपात परंतु भरघोस निधी उपलब्ध करण्याचे जिल्हा शाखेने प्रयत्न करणे बंधनकारक आहे. कारण सर्वांच्या मागण्यांसाठी मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयात याचिकेसाठी निधीची आवश्यकता असणार आहे.

८. सामाजिक उपक्रमाचे नियोजन सन २०२५-२६ मध्ये वार्षिक कृती आराखडा तयार करुन विविध उपक्रम परिपत्रक क्र.१५ दि.२२/७/२०२३ मधील सूचना विचारात घेऊन जास्तीत जास्त उपक्रम राबविण्याचे प्रयत्न करावयाचे आहे. **हे उपक्रम सेवानिवृत्त व ज्येष्ठ नागरिकांसाठी राबविणेत यावेत.**

९. जिल्हा कार्यकारीणी त्यांच्या अनुभवानुसार वरील थोड्याफार प्रमाणात गरजेनुसार बदल करु शकतात.

वरील मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन सन २०२५-२६ चे आगाऊ अंदाजपत्रक प्रत्येक जिल्हा शाखेने तयार करुन मार्च २०२५ च्या कार्यकारीणीच्या तातडीच्या बैठकीत प्राधान्याने मंजूर करवून घ्यावे. आगाऊ अंदाजपत्रक मंजूर केल्या शिवाय पुढील आर्थिक वर्षात केलेला खर्च अवैध ठरु शकतो.

प्रत्येक जिल्हाशाखेने कार्यकारीणीत मंजूर केलेले आगाऊ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक दि.१५ मार्च २०२५ पूर्वी मध्यवर्ती शाखेकडे पदाधिकारी यांच्या स्वाक्षरीसह स्कॅन केलेली प्रत ईमेल वर asgrf2014@gmail.com वर न चुकता पाठविण्यात यावी.

मुंबई विश्वस्त अधिनियम १९५० मधील कलम ३१(अ) नुसार विश्वस्तांना धर्मादाय आयुक्तांकडे आगाऊ अर्थसंकल्प सादर करणे कायद्याने बंधनकारक आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

मनोहर पोकळे

जा.क्र.कनिअकसं/पुणे/ ३३ सन २०२५

दिनांक : २५/०२/२०२५

कार्याध्यक्ष

प्रत, अध्यक्ष / उपाध्यक्ष, विभागीय अध्यक्ष, कृतिशील यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

प्रत, सर्व जिल्हाध्यक्ष/ सचिव महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना, यांना अग्रेषित संबंधित जिल्हा शाखा यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

प्रत, सर्व पदाधिकारी, मध्यवर्ती संघटना पुणे यांना माहिती व कार्यवाहीस्तव

प्रत, संघटनेच्या सर्व व्हाटस् अॅप ग्रुपवर प्रसिध्दीसाठी

प्रत, प्रसिद्धीपत्रक धारीका / मास्टर फाईल

# कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना, पुणे

## नमुना अंदाजपत्रक 2025-26 (परिपत्रक क्र.26 चे सहपत्र)

शाखा : ---------------- जिल्हा

| | जमा बाबी | | | खर्चच्या बाबी | |
|---|---|---|---|---|---|
| १ | आरंभीच शिल्लक | 100000 | 1 | सभागृह भाडे | 2000 |
| २ | स्थायी निधी | | 2 | चहा पानी नाश्ता | 4000 |
| | (i ) चालू वर्षी आजीवन सभासद फी (100 सभासद) | 100000 | 3 | स्टेशनरी पोस्टेज | 10000 |
| | (ii ) फॉर्म फी (आजीवन) | 1000 | 4 | स्मरणिका देणगी मध्यवर्तीकडे | 5000 |
| 3 | (i ) संस्थेची सभासद फी (वार्षिक) | 1000 | 5 | बँक चार्जेस | 1000 |
| | (ii ) फॉर्म फी | 100 | 6 | प्रवास खर्च | 5000 |
| 4 | स्मरणिका देणगी | 5000 | 7 | ऑडिट फी | 1000 |
| 6 | सर्वसाधारण देणगी | 50000 | 8 | सामाजिक उपक्रम खर्च | 100000 |
| 7 | पेन्शन प्रकरणे | 20000 | 9 | सादिल खर्च (बुके,फोटों ग्राफी,व्हिडीयो शूटिंग बुकलेट छपाई इ.) | 18100 |
| 8 | आश्रय दाते देणगी | 20000 | 10 | लधानिधी मध्यर्तीस वर्ग | **200000** |
| 9 | लढा निधी | 200000 | 11 | स्थायी निधी एफ.डी. करीता | 121000 |
| 10 | बँकेत खात्यावरील चालू व्याज | 5000 | 12 | 20% निधी मध्यवर्तीसं वर्ग | 10000 |
| | | | | **एकूण** | **477100** |
| | | | | पुढील वर्षासाठी शिल्लक | 25000 |
| | **एकूण** | 502100 | | **एकूण** | 502100 |

सचिव — कोषाध्यक्ष — अध्यक्ष

ज्येष्ठ नागरिक ही राष्ट्राची मौल्यवान व परिपक्व संपत्ती आहे

महाराष्ट्र शासनाच्या निवृत्तीवेतनधारकांची

# महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना

(सहा. निबंधक, पुणे नोंदणी क्र. 1151 दि. 31/5/14 व धर्मदाय आयुक्त, पुणे नों.क्र. फ–48300 दि. 23/3/2017)

संस्थापक पदाधिकारी : अध्यक्ष – मा. अरूण बोंगिरवार, विशेष अध्यक्ष – मा. अरविंद इनामदार, कार्याध्यक्ष – मा.र.ग. कर्णिक

* अध्यक्ष *
श्री. चंद्रकांत दळवी (भाप्रसे)
विभागीय आयुक्त (से.नि.) महसूल

* विशेष अध्यक्ष *
इंजि. व्यंकटराव गायकवाड
सचिव (से.नि.) जलसंपदा

* कार्याध्यक्ष *
इंजि. मनोहर पोकळे
मुख्य अभियंता व सहसचिव (से.नि.) जलसंपदा

## परिपत्रक क्र.24

दि. 03/02/2025

**विषय : महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी संघटना,पुणे यांचेशी राज्यातील राज्यस्तरावर/ जिल्हा/तालुका स्तरावर संलग्नता देणेसंबंधात मार्गदर्शक सूचना**

संदर्भ : कृतिशील कार्यकारी मंडळाची दि.9/12/2024 ची 14 वी बैठक ठराव क्र.8

1.0 **प्रस्तावना :** राज्यात कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी महासंघ स्थापन होणेस बराचसा कालावधी लागणार असल्याने तसेच राज्यातील काही खातेनिहाय सेवानिवृत्तांचे संघटनांनी संलग्नता द्यावी अशी मागणी केल्याने त्यायोगे कृतिशील सदस्यांची संख्या वाढून संघटनेच्या विस्तारास चालना मिळावी तसेच. तसेच या संघटनेकडील सेवा निवृत्तांचे प्रश्न सुटून त्यांचे जीवनमान उंचावून तणावरहीत जीवन जगावे या हेतुने राज्यातील राज्यस्तर/ जिल्हास्तर/ विभागीयस्तर व तालुकास्तरावरील सेवानिवृत्तांची संघटना संलग्न करणेचा मुद्दा संघटनेच्या विचाराधीन होता. त्यासाठी मार्गदर्शक सूचनांवर विस्तृत चर्चा होऊन खालील प्रमाणे मंजुरी देणेत आली आहे

2.0 **संघटनेचे ध्येय व उद्देश :**

1) सरकारी सेवेतून निवृत्त झालेल्या कृतिशील व्यक्तिंना एकत्र आणणे व त्यांच्या दीर्घ सेवेतील अनुभवाचा लाभ सामान्य नागरिकांना मिळावा आणि त्यांच्या स्वत:च्या प्रकृती स्वास्थ्यासाठी ते कार्यरत रहावेत हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून समाज उपयोगी कामे करणे.

2) राज्य सरकारी कृतिशील निवृत्तांना एकत्र आणणे, त्यांचे दैनंदिन जीवन सुखासमाधानाने व्यतीत करण्यासाठी मदत करणे, त्यांचे आरोग्य विषयक प्रश्न सोडविण्यास उपयुक्त सल्ला देणे, आरोग्य शिबीरे आयोजीत करणे, त्यांची आरोग्य तपासणी करणे, त्यांना सवलतीच्या दराने औषधोपचार उपलब्ध व्हावा यासाठी प्रयत्न करणे. ज्येष्ठांच्या विविध समस्यांसंबंधी, व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे, संमेलने आयोजीत करणे.

3) संस्थेच्या सभासदांच्या हिताच्या दृष्टीने सवलती मिळविण्याविषयी प्रयत्न करणे व मार्गदर्शन करणे. केंद्र शासनाच्या निवृत्त कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या सर्व सवलती मिळविण्याविषयी प्रयत्न करणे.

4) सरकारच्या विकास आणि कल्याणकारी योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचविणे व त्या योजना कार्यक्षमतेने अंमलात याव्यात यासाठी प्रयत्न करणे.

5) निवृत्तांच्या कौटुंबिक स्वास्थ्यासाठी सहाय्य करणे.

6) जनतेला त्यांचे हक्क व कर्तव्याची जाणीव करून देणे.

7) खेडी दत्तक घेऊन त्यांचा सर्वांगिण विकास करणे.

8) सरकार दरबारी जनतेची प्रलंबित असलेली कामे करण्यास मदत करणे.

9) शिक्षण पूर्ण करून नोकरी करावी ही तरूण मंडळींची मानसिकता बदलून त्यांना उद्योग, धंदा, व्यापार करण्यास प्रवृत्त व मदत करणे.

10) महिलांना फावल्या वेळात घरगुती उद्योग करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

11) प्रत्येक व्यक्तिस अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, रोजगार, आरोग्य मिळेल या महात्मा गांधींच्या विचारांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न व सहाय्य करणे.

12) संस्थेचे सभासद व नागरिकासाठी आरोग्य शिबिरे, व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे, संमेलने, सहली आयोजित करणे.

13) निवृत्त व जनतेला उपयुक्त होईल अशी पुस्तके, नियतकालिके, परिपत्रके आदी प्रकाशित करणे, वाचनालय चालविणे, विरंगुळा केंद्र, वृध्दाश्रम स्थापन करणे, मनोरंजनात्मक कार्यक्रम योजणे.

14) नागरिकांच्या व तत्सम अन्य संघटनांशी सहकार्य करणे.

15) नागरिकांच्या समस्यांबाबत समाजात जागृती निर्माण करणे, शासनापर्यंत त्या समस्यांचा पाठपुरावा करून त्यांचे योग्य निराकरण व्हावे यासाठी प्रयत्न करणे.

16) वृध्द नागरिकांना सहाय्य करणे, ज्येष्ठ महिलांच्या समस्या प्रती समाजाचे लक्ष वेधणे.

17) बेरोजगारांना उद्योगधंद्यास लावण्याचा प्रयत्न व मार्गदर्शन करणे.

18) रस्ते, शाळा, दवाखाने, शेती, रोजगार निर्मिती, वृक्षसंवर्धन, कुपोषणाचा प्रश्न, वृध्दांच्या व महिलांच्या समस्या, विक्री केंद्र, आरोग्य वगैरे क्षेत्रात कार्य करणे व जे कोणी कार्य करीत असतील अशांना मदत करणे.

19) दीर्घ आजाराने त्रस्त झालेल्या निवृत्त व त्यांच्या कुटुंबियांना सरकारी, सार्वजनिक व धर्मादाय रुग्णालयाचे सहाय्य तसेच सर्व प्रकारे मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे.

20) निवृत्तांच्या व तसेच सेवेत असलेल्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थां साठी त्यांना परवडेल या दराने जमीन मिळवून देण्याचा प्रयत्न व मार्गदर्शन करणे आणि सर्व प्रकारे मदत करणे.

21) समाजातील प्रत्येक घटकाला व समविचारी संस्थांना मदत तथा मार्गदर्शन करणे.

22) संघटनेच्या ध्येयपूर्तीसाठी जे जे काही करावे लागेल ते सर्व संस्था करेल.

23) सदर संस्था राजकारण, जातीभेद, धर्मभेद यापासून सर्वस्वी अलिप्त राहील.

24) **ज्येष्ठ नागरिकांना उतारवयात ज्यांचे जोडीदार हयात नाहीत, अश्यांना सुयोग्य जोडीदार शोधण्यात मदत करुन त्यांना मानसिक आधार देणेकामी त्यांचा शेवटचा टप्पा आनंददायी व सुखकर व्हावा यासाठी प्रयत्न करणे.**

## 3.0 संलग्नता सभासद फी, प्रवेश काढून टाकणे, नोंदणी इत्यादी.

3.1 जिल्हा पातळीवरील किंवा राज्य पातळीवरील संस्था, संस्था नोंदणी अधिनियम 1860 नुसार व धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे नोंदणीकृत झालेल्या आहेत. अशाच सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी संघटनांचा प्रवेश कृतिशील संघटनेत असेल.

3.2 **नोंदणी फी जिल्हा पातळीवर / राज्य पातळीवर धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे नोंदणी केलेल्या संस्थामध्ये संलग्नता प्रस्ताव सादर करतेवेळी जी सभासद संख्या असेल त्या प्रत्येक सभासदास, 100 रु. एकदाच असेल व संलग्न होणाऱ्या संस्थेस / संघटनेस सभासद संख्येनुसार संघटनेस नोंदणी फी दरवर्षी खालीलप्रमाणे असेल.**

| अ.क्र. | नोंदणीकृत सभासदांची संख्या | वर्ष | संघटना नोंदणी फिस |
|---|---|---|---|
| 1 | 11 पर्यंत | 1 वर्ष | 500/- |
| 2 | 12 ते 50 | 1 वर्ष | 700/- |
| 3 | 51 ते 100 | 1 वर्ष | 1000/- |
| 4 | 100 ते 500 | 1 वर्ष | 2000/- |
| 5 | 500 ते 1000 | 1 वर्ष | 4000/- |
| 6 | 2001 ते त्यापेक्षा जास्त | 1 वर्ष | 6000/- |
| 7 | तालुका | 1 वर्ष | 1000/- |
| 8 | जिल्हा | 1 वर्ष | 2000/- |
| 9 | राज्य | 1 वर्ष | 5000/- |

सदर संघटनेची ची संलग्नता **फी दरवर्षाच्या सुरुवातीस (माहे एप्रिल) मध्ये** भरावयाची आहे. ज्या संस्था/संघटना धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या नाहीत परंतु सभासद मर्यादीत आहे, त्यांना व्यक्तीगत **रु.1001/-, रु.5001/-, रु.10000/-** देऊन राज्य महासंघाचे आजीवन व आश्रयदाता सदस्य होता येईल.

3.3 ज्या व्यक्तींना / संस्थांना कृतिशील संघटनेत प्रवेश घ्यावयाचा आहे. त्यांनी 2.2 प्रमाणे कार्यवाही करुन अध्यक्ष / सचिव यांच्या नावाने **प्रवेश अर्ज फी** सह सादर करावा.

3.4 संस्थेच्या प्रवेशाबाबतचा निर्णय कार्यकारी मंडळाने प्रवेश मंजूर केल्यानंतर असेल.

3.5 **नुतनीकरणाची मुदत संपल्यावर 6 महिन्याच्या आत फी भरणे आवश्यक** आहे. अन्यथा सदस्यत्व आपोआप रद्द होईल.

3.6 **कृतिशील संघटनेतून सदस्यत्व स्वतःहून काढून घेता येईल. परंतु पुर्वीची पूर्ण बाकी भरल्यावर व कार्यकारी मंडळाने मंजूरी दिल्यावर सदस्यत्व रद्द करता येईल.**

3.7 कृतिशील संघटनेतून **एखादी संस्था बंद करण्याबाबत 80% सभासदांनी मान्यता** दिली पाहिजे. तदनंतद संबंधित संस्थेने विनंती अर्ज करणे आवश्यक राहीन.

3.8 कृतिशील संघटनेतून सदस्यत्व रद्द केल्यानंतर पुन्हा संस्था, कृतिशील संघटनेत प्रवेश घेऊ शकते. परंतु 2.7 प्रमाणे दर्शविल्यानुसार व कृतिशील संघटनेने पुन्हा त्यांनी विहित करुन घेण्यास मान्यता दिल्यानंतरच.

3.9 कृतिशील संघटनेचे चिटणीस **हे संलग्न संघटनेच्या सभासदांचे नाव, पत्ते इत्यादी माहिती ठेवतील** त्याच बरोबर सर्व साधारण सभेचे सदस्य व व्यवस्थापन समितीचे सदस्य यांची माहिती ठेवतील. एखाद्या सभासदाने या बाबतची माहिती मागीतली तर ते देतील.

4. **नियम व नियमावली - महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेच्या विधानपत्र (ज्ञापन) परिशिष्ट क्र. 'क' नुसार राहील.**

5. **सर्वसाधारण सभा आणि कार्यकारी मंडळ**

5.1 (अ) **सर्वसाधारण सभा** ही कृतिशील संघटनेची सर्वोच्च सभा असेल यामध्येच कार्यकारी मंडळाचे सदस्य असतील.

(ब) सर्वसाधारण सभेस कृतिशील मध्यवर्ती व जिल्हास्तरीय शाखेचे नामनिर्देशित सदस्य व संलग्न होणाऱ्या संस्था/संघटना यांनी कृतिशील **संघटनेस नामनिर्देश केलेले केलेले पाहुणे सदस्य. या कृतिशील संघटनेस सर्वसाधारण सभेवर त्यांच्या संख्येनुसार पाठवण्यात आलेले सदस्य.**

5.1 (ब) राज्य / जिल्हा/तालुका पातळीवरील नोंदणीकृत संलग्नता मागणाऱ्या संस्था व त्यांनी सर्वसाधारण सभेवर त्यांच्या संख्येनुसार पाठवण्यात आलेले सदस्य : 1) **500 संख्येपर्यंत 11 सदस्य, 2) 500 ते 1000 पर्यंत 21 सदस्य, 3) 1001 ते त्यापुढे 31 सदस्य,** राज्य सदस्य प्रतिनिधी असतील व मध्यवर्ती पातळीवरील कृतिशील पुणे शहराचे 31, विभागीय पातळीवरील **(अ)** 500 सभासदांचे पुढे सभासद संख्या असेल तर 21, **(ब)** 500 पेक्षा कमी असतील तर 11, तर जिल्हा पातळीवरील 11 सदस्य असतील. अशा प्रकारे आम सभा तयार होईल.

**5.2 कृतिशील कार्यकारी मंडळ**

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | 01 |
| विशेष अध्यक्ष | : | 01 |
| उपाध्यक्ष (मुख्यालय) | | 04 |
| उपाध्यक्ष (प्रदेशनिहाय) | : | 07 मुंबई, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, पुणे, कोकण, |
| कार्याध्यक्ष | : | 01 |
| सहकार्याध्यक्ष | : | 01 |
| सरचिटणीस | : | 01 |
| चिटणीस | : | 01 |
| विभागीय सरचिटणीस | | 07 मुंबई, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, पुणे, कोकण, |
| विभागीय महिला सरचिटणीस | : | 07 मुंबई, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, पुणे, कोकण, |
| कोषाध्यक्ष | : | 01 |
| सहकोषाध्यक्ष | : | 01 |
| कार्यकारी सदस्य | : | 06 |
| पदसिद्ध सदस्य | : | 02 |
| एकूण | : | 41 |

5.3 कृतिशील **संघटनेत जिल्हा / तालुका स्तरीय कार्यकारी मंडळ / संलग्न होऊ इच्छिणाऱ्या** संस्था यांचा समावेश असू शकतो.

5.4 कृतिशील कार्यकारी मंडळात समिती कांही व्यक्तींची आवश्यकता असल्यामुळे **नामनिर्देशाने निमंत्रित नियुक्ती करू शकते**. परंतु सदरील नियुक्तीस आम सभेची मान्यता द्यावी लागेल.

5.5 कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे कृतिशील संघटनेच्या विधानपत्रातील अ.क्र.12 प्रमाणे असतील.

5.6 सर्वसाधारण व विशेष सर्वसाधारण सभा तिचे अधिकार व कर्तव्ये कृतिशील संघटनेच्या विधानपत्रातील **अ.क्र. 7, 8 व 9 नुसार असतील.**

## 6. निवडणूक

6.1 कार्यकारी मंडळाचे निवडणूक नियम कृतिशील संघटनेच्या विधानपत्रातील **अ.क्र.15** नुसार असतील.

6.2 निवडणूकीसाठी अध्यक्ष, विशेष अध्यक्ष, कार्याध्यक्ष, सरचिटणीस, कोषाध्यक्ष यांनी फॉर्म भरण्याची फी रु. 3000/- असेल तर उर्वरीत पदाधिकाऱ्यांसाठी रु.2000/- असेल. जर पदाधिकारी विजयी झाले तर त्यांची अनामत रक्कम परत मिळेल.

## 7. सर्वसाधारण

7.1 कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना यांची मालमत्ता कार्यकारी समितीच्या पदाधिकाऱ्यांची जबाबदारी ही विश्वस्त म्हणून असेल.

7.2 कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेचे विसर्जन हे कृतिशील संघटनेचे विधानपत्र अ.क्र.16 नुसार असेन.

**वरील मार्गदर्शक सूचनांना सर्वसाधारण सभेची मान्यता यथावकाश घेण्यात यावी व या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.**

जा.क्र.कनिअकसं/पुणे/ 16 सन २०२५
दिनांक : ४/०२/२०२५

(इंजि. मनोहर कि. पोकळे)
कार्याध्यक्ष

प्रत, अध्यक्ष / उपाध्यक्ष, विभागीय अध्यक्ष, कृतिशील यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

प्रत, सर्व जिल्हाध्यक्ष/ सचिव महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना, यांना अग्रेषित संबंधित जिल्हा शाखा यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

प्रत, सर्व पदाधिकारी, मध्यवर्ती संघटना पुणे यांना माहिती व कार्यवाहीस्तव

प्रत, संघटनेच्या सर्व व्हाटस् ॲप ग्रुपवर प्रसिध्दीसाठी

प्रत, प्रसिद्धीपत्रक धारीका / मास्टर फाईल

ज्येष्ठ नागरिक ही राष्ट्राची मौल्यवान व परिपक्व संपत्ती आहे

महाराष्ट्र शासनाच्या निवृत्तीवेतनधारकांची

# महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना

(सहा. निबंधक, पुणे नोंदणी क्र. 1151 दि. 31/5/14 व धर्मदाय आयुक्त, पुणे नों.क्र. फ–48300 दि. 23/3/2017)

संस्थापक पदाधिकारी : अध्यक्ष – मा. अरूण बोंगिरवार, विशेष अध्यक्ष – मा. अरविंद इनामदार, कार्याध्यक्ष – मा.र.ग. कर्णिक

* अध्यक्ष *
**श्री. चंद्रकांत दळवी** (भाप्रसे)
विभागीय आयुक्त (से.नि.) महसूल

* विशेष अध्यक्ष *
**इंजि. व्यंकटराव गायकवाड**
सचिव (से.नि.) जलसंपदा

* कार्याध्यक्ष *
**इंजि. मनोहर पोकळे**
मुख्य अभियंता व सहसचिव (से.नि.) जलसंपदा

## परिपत्रक क्र.23

दि. 26/01/2025

## विषय : ज्येष्ठ नागरिकांना उतारवयात जोडीदार संशोधन पथदर्शी योजना

संदर्भ : कृतिशील कार्यकारी मंडळाची दि.9/12/2024 ची 14 वी बैठक ठराव क्र.11

**प्रस्तावना** :

कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेत महाराष्ट्र शासन ज्यांना सेवानिवृत्ती वेतन देते, त्या सर्वांचे आरोग्य उत्तम रहावे, तसेच त्यांची ताणतणावापासून मुक्ती व्हावी, त्याचबरोबर त्यांच्या ज्ञानाचा उपयोग हा समाजातील सर्व घटकांना व्हावा, या उद्देशाने ही संघटना कार्यरत आहे.

सर्वांना त्यांचे जीवन जगत असतांना बऱ्याच अडीअडचणीस सामोरे जावे लागत असते. वैवाहिक सौख्य फारच कमी जनांचे वाट्यास येते. संसार सागरात वैवाहिक संस्थाबरोबरच संतती व संगोपन, शिक्षण व आरोग्य याबाबींवर कटाक्षाने लक्ष द्यावे लागते. हा प्रयत्न करीत असताना आयुष्याचे संक्रमणात आपल्या जोडीदाराचे संसारातून या ना त्या कारणाने नाहिसे होणे, कुटुंबाचे दृष्टीने अत्यंत दु:खद/वेदनादायी असते. याचा प्रत्यय आपणास क्षणोक्षणी येत असतो. यात दुमत असण्याची कारण नाही.

**सेवा कोणासाठी** :

ही योजना फक्त ज्या आजीवन सभासदांचा जोडीदार उतारवयात हयात नाही, अशांसाठीच ऐच्छिक स्वरुपात असणार आहे. त्यासाठी रु.१०००/- देणगीशुल्क आकारले जाईल. तसेच त्यांचे कुटुंबातील इतर सदस्यांची मागणी असल्यास रु.२०००/- देणगीशुल्क घेऊन त्यांची प्रकरणे हाताळण्यात येतील. तर संघटनेच्या बाहेरील व्यक्तीने मागणी केल्यास रु.३०००/- देणगी शुल्क घेण्यात येईल.

**कार्यपद्धती** :

आपण आजीवन सभासद असल्याचे राज्यातील कोणत्याही जिल्हा शाखेच्या अध्यक्ष/सचिव यांनी प्रमाणित केलेनंतरच ही सेवा देण्यात येईल किंवा आजीवन सभासद फी भरल्याची पावती ग्राह्य धरण्यात येईल. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीने लेखी विनंती केल्यासच, सदरचे देणगीशुल्क गुगल पे/ फोन पे/ पेटीएम द्वारे मोबाईल क्र.९५०३०५२०८० द्वारे (युनियन बँक ऑफ इंडिया, अहमदनगर शाखा) भरता येईल. हि पथदर्शी योजना आहे.